CMYK

राज्यातील तिसरे दिव्याशा केंद्र बुलढाण्यात; दिव्याशा केंद्र दिव्यांगासाठी पर्वणी - ना. प्रतापराव जाधव >> पान 2

दुष्काळी आष्टी तालुक्यातील केळी थेट इराणच्या बाजारपेठेत; शेतकऱ्याचा यशस्वी प्रयोग >> पान 3

प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राचं केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते लोकार्पण >> पान 4

**सुविचार**

शहाणपण हे वयावर नाही तर अनुभवावर अवलंबून असते

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 167 ■ मंगळवार, दि. 28 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



'अरुंधती' पुन्हा येतेय! 'या' मालिकेत मधुराणी गोखले करणार धमाकेदार एन्ट्री आतील पान

# उत्तराखंड यूसीसी लागू करणारे पहिले राज्य

## मुख्यमंत्री धामी म्हणाले- हलाला, एकापेक्षा जास्त लग्न, तीन तलाकवर पूर्णपणे बंदी घालण्यात येईल

**मुंबई/प्रतिनिधी : उत्तराखंड राज्यामध्ये समान नागरी कायद्याची अंमलबजावणी झाली असून आता सर्व धर्म आणि जातींसाठी एकच कायदा असणार आहे. त्यामध्ये लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्यांसाठी एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्यासाठी आता पालकांची परवानगी आवश्यक असेल. तसेच त्या जोडप्याला लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असल्याची माहिती रजिस्ट्रारला द्यावी लागणार आहे. तसे न केल्यास १० हजारांचा दंड लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे लिव्ह इन मध्ये राहणाऱ्या जोडप्याला जर मूल झाले तर ते कायदेशीर मानले जाईल.**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या मंजुरीनंतर, निवृत्त न्यायमूर्ती रंजन प्रकाश देसाई यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय समितीने २ फेब्रुवारी २०२४ रोजी यूसीसी वर एक मसुदा तयार केला. त्याला उत्तराखंड सरकारने ४ फेब्रुवारी रोजी मान्यता दिली. त्यानंतर हे विधेयक विधानसभेत मंजूर करण्यात आले आणि १८ फेब्रुवारी रोजी राज्यपाल लेफ्टनंट जनरल गुरमीत सिंग (निवृत्त) यांनी याला मंजुरी दिली. ७५० पानांच्या मसुद्यात लग्नासाठी मुलीचे वय १८ वर्षे आणि मुलाचे वय २१ वर्षे असणे आवश्यक आहे असं नमूद करण्यात आलं आहे.



लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहण्याऱ्या जोडप्याला नातेसंबंधाची माहिती रजिस्ट्रारला द्यावी लागेल. जर त्यांना नाते संपवायचे असेल तर त्याची माहितीही त्यांना रजिस्ट्रारलाही कळवावे लागेल. एका महिन्यापेक्षा जास्त काळ नोंदणी न करता लिव्ह-इनमध्ये राहिल्यास १०,००० रुपये दंड आकारला जाईल. निबंधक नोंदणीकृत जोडप्याची माहिती त्यांच्या पालकांना देतील आणि ही माहिती पूर्णपणे गोपनीय असेल. नव्या समान नागरी कायद्यानुसार, लिव्ह-इनमध्ये जन्मलेले मूल कायदेशीर मानले जाईल. जर संबंध तुटले तर स्त्री त्याच्या देखभालीसाठी अर्ज करू शकते. लिव्ह-इन रिलेशनशिप दरम्यान जन्मलेल्या मुलाला त्या जोडप्याचे मूल मानले जाईल आणि त्याला सर्व अधिकार मिळतील.

प्रत्येक धर्माला आपापल्या चालीरीतींनुसार विवाह करण्याचा अधिकार आहे, परंतु विवाहाची नोंदणी आवश्यक आहे. यूसीसी कायद्यानुसार, ६० दिवसांच्या आत लग्नाची नोंदणी करणे आवश्यक आहे. घटस्फोट आणि वारसांमध्ये समानता आणली आहे. सर्व धर्माचे लोक आपापल्या चालीरीतींचे पालन करू शकतात. यामध्ये कोणतेही बदल केले जाणार नाहीत.

लग्नाची नोंदणी केल्यानंतर उपनिबंधकांना १५ दिवसांत योग्य तो निर्णय घ्यावा लागेल. तसे न झाल्यास अर्ज निबंधकांकडे जाईल. विवाह नोंदणी ऑनलाइन देखील करता येते जेणेकरून एखाद्याला सरकारी कार्यालयात जावे लागणार नाही. २७ मार्च २०१० या तारखेपासून होणाऱ्या सर्व विवाहांची नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

इस्लाममध्ये प्रचलित असलेल्या हलाला प्रथेवर यूसीसीमध्ये बंदी घालण्यात आली आहे. उत्तराखंडमध्ये राहणारे मुस्लिम लोक हलाला प्रथा पाळू शकत नाहीत. बहुपत्नीत्वावरही बंदी आहे. या कायद्याद्वारे, विवाहाप्रमाणे, घटस्फोटाची नोंदणी देखील आवश्यक आहे, जी वेब पोर्टलद्वारे केली जाऊ शकते. यूसीसी अंतर्गत, सर्व धर्मांना मूल दत्तक घेण्याचा अधिकार आहे, परंतु स्वतःच्या धर्माचे मूल दत्तक घेतले जाऊ शकते. दुसऱ्या धर्माचे मूल दत्तक घेण्यावर बंदी आहे. यूसीसीअंतर्गत, सर्व समुदायांमध्ये, मुलगा आणि मुलगी यांना वडिलांच्या मालमत्तेत समान अधिकार मिळेल. नैसर्गिक संबंध किंवा लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये जन्मलेल्या मुलांचाही मालमत्तेतील हक्क समजला जाईल.

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर पत्नी आणि मुलांसह आई-वडिलांनाही मालमत्तेत हक्क मिळेल. मालमत्तेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास मृत व्यक्तीच्या मालमत्तेत पत्नी, मुले आणि पालकांना समान हक्क मिळेल. घटनेच्या कलम ३४२ मध्ये नमूद केलेल्या अनुसूचित जमातींना यूसीसीच्या बाहेर ठेवण्यात आले आहे. या जमातींना त्यांच्या प्रथा आणि परंपरांच्या रक्षणासाठी यूसीसीच्या बाहेर ठेवण्यात आले आहे. याशिवाय ट्रान्सजेंडर्सच्या परंपरांमध्ये कोणताही बदल झालेला नाही.

# सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही

दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी** : जिल्ह्यात राष्ट्रवादी आणि शिवसेनेमध्ये पालकमंत्रिपदावरुन सुरू झालेला वाद आता आणखी विकोपाला गेल्याचं दिसून येतंय. राष्ट्रवादीच्या आदिती तटकरेंच्या पालकमंत्रिपदाला शिंदेंच्या शिवसेनेचा विरोध कायम आहे. शिंदेंचे आमदार महेंद्र दळवींनी खासदार सुनील तटकरेंवर जोरदार टीका केली आहे. आगामी काळात सुनील तटकरेंना जिल्ह्यात फिरु देणार नाहीत असा इशाराच आमदार महेंद्र दळवींनी दिला आहे. तर लवकरच भरत गोगावलेंना रायगडचे पालकमंत्रिपद मिळणार असल्याचं भाकितही त्यांनी केलं.

अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथे स्वर्गीय प्रमोद केशव ठाकूर प्रवेशद्वार नामकरण सोहळ्याचे उद्घाटन प्रसंगी पुन्हा एकदा शिंदे सेनेच्या आमदारांकडून खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीकास्त्र सोडण्यात आलं.

आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, एकनाथ शिंदेंसमोर आम्ही आमची कैफियत मांडली आहे. भरत गोगावले यांचे पालकमंत्रिपदाच्या रेस मधील नाव गायब होऊन आदिती तटकरे यांचे टाकण्यात आलं. प्रोटोकॉलनुसार पालकमंत्रिपद हे भरत गोगावलेनाच मिळायला हवं होतं. मात्र तटकरे यांनी गोगावले यांचे नाव यादीतून हटवण्यासाठी त्यांची जादू चालवली. यादीतून नाव गायब करणं हा तटकरे यांचा स्वभाव आहे. सुनील तटकरे यांना गोगावले हे मंत्री झाले तर पालकमंत्री निश्र्चित होणार हे माहीत झाल्यानेच त्यांनी पालकमंत्री पद त्यांच्याकडे खेचून आणलं. मात्र आमच्या आक्रोशानंतर मुख्यमंत्र्यांनी यावर स्थगिती आणली. आम्ही आता आशावादी आहोत की येणाऱ्या चार दिवसात भरत गोगावले पालकमंत्री होतील.

## पालकमंत्रिपदाचा वाद विकोपाला, भरत गोगावले समर्थक आमदार आक्रमक



सुनील तटकरेंवर टीका करताना आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, सुनील तटकरे यांचा पूर्व इतिहास महाराष्ट्राला माहीत आहे. सुनील तटकरे यांनी राष्ट्रवादी प्रदेशाध्यक्ष पदाचा वापर करून दबाव तंत्र वापरलं. त्यानी प्रोटोकॉलचे पालन केलं नाही. तटकरे जरी पालकमंत्री पद खेचून आणण्यात यशस्वी झाले असले तरी ते येणाऱ्या काही दिवसात अयशस्वी ठरतील. आता कितीही काही झालं तरी येणाऱ्या काळात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री याबाबत योग्य निर्णय घेतील. महेंद्र दळवी म्हणाले की, भरत गोगावले यांचं नाव यादीतून वगळल्यानंतर रायगडमध्ये मोठा उठाव झाला. हा खरं तर आमचा आणि लोकांचा उद्रेक आहे.

गोगावले हे पालकमंत्री पदाचे दावेदार असतानासुद्धा तटकरेंनी आपल्या झोळीतच दान टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र आता कधीच असं होणार नाही. कारण सुनील तटकरे यांची झोळी फाटली आहे. आता जे काही दान पडेल ते भरत गोगावले यांच्या झोळीतच पडेल.

लोकसभेला आम्ही सगळ्यांनी सुनील तटकरे यांचे प्रामाणिक काम केलं होतं. खरंतर सुनील तटकरे यांच्याबद्दल आमच्या मनात निगेटिव्हिटी होती. परंतु आम्ही त्यांच्यासाठी पॉझिटिव्ह होऊन त्यांना निवडून दिलं. परंतु नेहमीप्रमाणे सुनील तटकरे यांनी त्यांची रणनीती तयार करून आम्हाला दगा दिला. सुनील तटकरे यांनी आतापर्यंत लोकांना फसवण्याचाच धंदा केला. आता तटकरे यांच्या विरोधात एकच मोहीम सुरू झालेली आहे ती म्हणजे तटकरे हटाव मोहीम. येणाऱ्या काळात सुनील तटकरे यांना जिल्ह्यात फिरू देणार नाही.

# चंद्रपूर जिल्हा परिषद समोर वयोवृद्ध सेवानिवृत्त शिक्षकांचे आंदोलन





दैनिक आपला विदर्भ

**चंद्रपूर/प्रतिनिधी** : चंद्रपूर जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघातर्फे विविध मागण्यांसाठी २७ जानेवारीला जिल्हा परिषद समोर धरणे आंदोलन व साखळी उपोषण करण्यात आले.

या धरणे आंदोलनात सेवानिवृत्त शिक्षकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये सेवानिवृत्त शिक्षकांना निवड श्रेणीच्या लाभापासून वंचित ठेवणे, शिक्षक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी यांना सातव्या वेतन आयोगाचे हफ्ते तात्काळ देण्यात यावे, पेन्शन १ तारखेला शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात यावी अश्या विविध मागण्या आजच्या धरणे आंदोलनात करण्यात आल्या, यावेळी सेवानिवृत्त शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांने माहिती दिली की जिल्हा परिषद आमच्या मागण्या तात्काळ निकाली काढू शकते मात्र त्यांच्या उदासीनतेमुळे आजही आमच्या मागण्या प्रलंबित आहे.यावेळी धरणे आंदोलनाला आमदार किशोर जोरगेवार यांनी भेट देत समस्या लवकर निकाली काढू असे आश्र्वासन दिले. आमदार जोरगेवार यांच्या समक्ष जिल्हा परिषद मुख्य कार्यपालन अधिकारी विवेक जॉन्सन यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. जर मागण्या पूर्ण झाल्या नाही तर ३० जानेवारी पासून जिल्हा परिषदेसमोर समस्या निकाली लागेपर्यंत साखळी उपोषण करणार असा इशारा देण्यात आला.

# आगामी निवडणूकांच्या कामाला लागा पदाधिकाऱ्यांना आमदार सिद्धार्थ खरात यांनी दिल्या सूचना

## पदाधिकारी बैठकीतून कार्यकर्त्यांनमध्ये भरला उत्साह







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले असून अवघे काही दिवस उरले आहेत.त्यामुळे शिवसेना( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कामाला लागा व चांगले काम करा.सर्वच्या सर्व जागा स्वबळावर जिंकूया त्यामुळे जोमाने काम करा, असे आदेश आमदार सिद्धार्थ खरात यांनी यांनी पदाधिकाऱ्यांना दिले. आमदार खरात हे मेहकर येथील हॉटेल केव्ही प्राईड येथे घेण्यात आलेल्या पदाधिकारी कार्यकर्ता बैठकीत बोलत होते, आगामी निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर आमदार खरात यांनी, तालुका प्रमुख,शाखा प्रमुख सर्व संपर्क प्रमुखांशी संवाद साधला.कार्यकर्त्यांनी ग्राम स्तरावर जनतेच्या कामांना प्राधान्य द्यावे त्यांच्या समस्या सोडवा,गावातील विकास कामांचे प्रस्ताव द्यावे, गोरगरीबांच्या समस्या सोडवा, अधिकारी कर्मचारी यांच्याकडून जनतेची कामे करून घ्या त्यात कोणी अडथळा आनत असेल तर त्याला शिवसेना स्टाईल ने चोप द्या अशा प्रकारे आमदार सिद्धार्थ खरात यांनी कार्यकर्त्यांन मध्ये एक प्रकारे उत्साह भरला, या वेळी सर्व संपर्क प्रमुखांनी मतदारसंघात गावा गावात जाऊन कार्यकर्ते जोडणे आवश्यक आहे, त्यांच्या सोबत संबंधित उपजिल्हाप्रमुख आणि तालुकाप्रमुख सर्कल प्रमुख यांना सोबत घ्यावे आणि प्रत्येक पंचायत समिती गणामध्ये बैठक आयोजित करणे आवश्यक आहे. बैठकीसाठी स्थानिक विभागप्रमुख, उपविभागप्रमुख, शाखाप्रमुख (पुरुष-महिला), युवासेना शाखा युवा पदाधिकारी यांना सोबत घ्यावे अशा सुचना केल्या या वेळी उपजिल्हा प्रमुख आशिष रहाटे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, दिपक मापारी, विनायक मापारी रमेश बापू देशमुख, किसन पाटिल, नारायण बळी, मेहकर शहर अध्यक्ष किशोर भाऊ गारोळे, ड आकाश घोडे, गजानन जाधव, विजय मोरे, योगेश कंकाळ, जीवन घायाळ, ऋषिकेश जगताप, परमेश्र्वर दहातोंडे, श्रीकांत मादनकर, विजय लोखंडे,समाधान ठाकरे, गजानन राठोड, महादेव उर्फ बाळूभाऊ पारवे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.





# बीडमधील आणखी एका गँगवर मकोका अंतर्गत कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी** : बीड पोलिसांनी मागील महिनाभरात जिल्हाभरात दहशत माजविणाऱ्या दोन गँगवर मकोका अंतर्गत कारवाई केलीय. सुदर्शन घुले याच्या गँगवर मकोका लावल्यानंतर आज बीड पोलिसांनी आठवले गँगवर देखील मकोकाची कारवाई केलीय.

१३ डिसेंबर २०२४ ला पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत गोळीबारची घटना घडली होती. त्यातील सहा आरोपींवर ही कारवाई करण्यात आली. यात प्रामुख्याने अक्षय आठवले, सनी आठवले, आशिष आठवले, मनीष क्षीरसागर आणि ओंकार सवई याचा समावेश आहे. या आरोपींनी आतापर्यंत १९ गंभीर स्वरूपाचे गुन्हे केले आहेत.

या संपूर्ण गुन्ह्याचा तपास केल्यानंतर या गँगवर मकोका कारवाई करण्यात आली आहे. काही दिवसांपूर्वी पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ आणि सनी आठवले याची कथित ऑडिओ क्लिप वायरल झाली होती. याच आठवले वर ही कारवाई करण्यात आली आहे.

ज्या ठिकाणी गंभीर गुन्हे घडत आहेत. त्या ठिकाणी मकोका प्रस्ताव पाठवला जाणार आहे. तसेच गंभीर स्वरूपातील गुन्हेगाराची पार्श्र्वभूमी आणि टोळीची माहिती घेऊन ही कारवाई सुरू राहणार असल्याचं पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी सांगितले आहे.

CMYK

## जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील मैलाचा दगड

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दहा हजार भारतीयांचा जीनोम सिक्वेसिंग डेटा जाहीर करण्यात आला आहे. जैवतंत्रज्ञान क्षेत्रातील ही फार मोठी घडामोड असल्याचे मानले जाते. भारतीयांच्या जनुकीय विविधतेचे प्रतिनिधित्व करणारा हा जीनोम इंडिया डेटा आता संशोधकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहा हजार भारतीय नागरिकांचा, जीनोम सिक्वेसिंग डेटा जाहीर केला. जैवतंत्रज्ञान संशोधनाच्या क्षेत्रातील हा 'मैलाचा दगड' असल्याचे मानले जाते. देशातील जनुकीय विविधतेचे प्रतिनिधित्व करणारा जीनोम इंडिया डेटा,'इंडियन बायोलॉजिकल डेटा' सेंटरमधील संशोधकांना उपलब्ध होणार आहे. हा राष्ट्रीय डेटाबेस अनुवांशिक आणि संसर्गजन्य रोगांच्या उपचारांमध्ये प्रगती सुलभ करेल, नवीन औषधे आणि अचूक वैद्यकीय तंत्रांच्या विकासास चालना देईल आणि विविध समुदायांच्या जीवनशैली आणि सवयींमध्ये संशोधन करण्यास सक्षम करेल, असे मानले जाते. त्यासाठीच जीनोम म्हणजे काय? हे समजून घेणे गरजेचे ठरते. एखाद्या सजीवातील डीएनए अनुक्रमांचा संपूर्ण संच आणि त्या सजीवाच्या कार्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व सूचना या जीनोममध्ये असतात. यात भ्रूणोत्पत्ती, वाढ, पर्यावरणास प्रतिसाद देणे आणि रोगापासून बरे होणे, यांचाही समावेश आहे. जीनोम इंडियाचे प्राथमिक उद्दिष्ट भारताच्या लोकसंख्येसाठी, अनुवांशिक भिन्नतेची एक व्यापक सूची तयार करणे हे असून, ते भारतातील विविधतेला अधिक चांगल्याप्रकारे उपयोगी पडेल. जानेवारी २०२० साली ही योजना सुरू करण्यात आली आहे. दहा हजार भारतीयांचे जीनोम सिक्वेन्सिंग डेटाचे प्रकाशन, भारताच्या जैवतंत्रज्ञान संशोधन क्षमतांमध्ये आणि सार्वजनिक आरोग्य आव्हानांना तोंड देण्याच्या क्षमतेमध्ये, एक मैलाचा दगड ठरली आहे. 'जीनोम इंडिया' नावाचा हा उपक्रम, देशाच्या विशाल तसेच प्रदेशानुसार, विषम लोकसंख्येतील अनुवांशिक विविधता समजून घेण्यासाठी, एक मौल्यवान संसाधन प्रदान करणारा ठरेल, असे म्हणता येते. या प्रकल्पाचे महत्त्व अनेक प्रमुख घटकांवरून लक्षात येते. भारताची लोकसंख्या ही जगातील सर्वात मोठी असून, यात अनुवांशिक विविधताही आहे. भारताचा समृद्ध इतिहास आणि हजारो वर्षांच्या प्राचीन परंपराचा वारसा सांगणार्या उत्पत्तीचे प्रतिबिंब यात दिसून येते. ही विविधता, संशोधकांसाठी आव्हाने आणि संधी दोन्हीही प्रदान करणारी आहे. अधिक चांगली आरोग्यसेवा देण्यासाठी तसेच, प्रभावी आणि लक्ष्यित रोग-विशिष्ट उपचार विकसित करण्यासाठी, ही अनुवांशिक समजून घेणे अत्यंत आवश्यक असेच. संशोधनाला चालना देण्यासाठी या डेटाची उपलब्धता, ही अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण भारतातील तसेच, आंतरराष्ट्रीय स्तरावर संशोधकांना डेटा उपलब्ध होणार आहे. या डेटाची उपयुक्तता अतिशय मौल्यवान अशीच आहे. वैद्यकशास्त्रात, मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि विविध कर्करोग यासारख्या भारतातील प्रचलित आजारांचा अनुवांशिक आधार समजून घेण्यासाठी, हा डेटा मोलाची भूमिका बजावेल, असे म्हणता येते. हे ज्ञान वैयक्तिकृत औषध पद्धतींच्या विकासाचा मार्ग मोकळे करणार आहे. व्यक्तीच्या अनुवांशिकतेनुसार उपचार केले जाणे, ही फार मोठी गोष्ट आहे. त्याशिवाय, जीनोमिक डेटाचे विश्र्लेषण करून, संशोधक कमी दुष्परिणामांसह अधिक प्रभावी औषधे विकसित करू शकतात. औषधांव्यतिरिक्त, जीनोम इंडिया प्रकल्प मानवी उत्क्रांती आणि त्यांचे स्थलांतर याबाबतही व्यापक संशोधन करण्याची संधी प्रदान करणार आहे. मानवी स्थलांतराचा जो इतिहास आज सांगितला जातो, त्याची तपासणी करणे याद्वारे शक्य होणार आहे. मानववंशशास्त्रीय आणि ऐतिहासिक संशोधनासाठी तो मौल्यवान माहिती प्रदान करणार आहे. भारतीय जनुकीय डेटा भविष्यातील महामारींशी लढण्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. भारताच्या लोकसंख्येतील जैवविविधता अत्यंत महत्त्वाची आहे. भारतीय जनुकांचे विविधता असलेल्या माहितीच्या आधारे, विविध भागातील सामान्य रोगप्रतिकारक क्षमता आणि आनुवंशिकरित्या संवेदनशीलतेचे स्पष्ट चित्र आखता येईल. यामुळे साथीचे रोग आणि अन्य रोगजनकांच्या महामारीसाठी प्रभावी उपचार पद्धती आखता येईल. रोगांचा प्रारंभ व प्रसार समजून घेण्यासाठी ,जनुकीय विश्र्लेषण अत्यंत आवश्यक आहेच. महामारी आल्यास, एका विषाणूच्या विकासाचे आणि प्रसाराचे ट्रॅकिंग करण्यासाठीही याचा आधार घेतला जाऊ शकतो. विशेषतः म्युटेटेड प्रकारांची ओळख पटवण्यासाठी या माहितीचा उपयोग होणार आहे. जनुकांच्या डेटाबेसमुळे महामारीची आव्हाने ओळखण्यात, त्यावर उपाययोजना करण्यामध्ये कार्यवाही करण्यास मदत होते. त्याचा वापर करून, सामान्यांची आरोग्याबाबत जागरूकता वाढवणे आणि सरकारी धोरणे अधिक प्रभावी बनवणेही शक्य होणार आहे. भारतीय परंपरेतील आयुर्वेद आणि इतर वैकल्पिक उपचार पद्धतींमध्ये जनुकीय ज्ञानाचा उपयोग करून, आरोग्य व्यवस्थेत अनेक सुधारणा साधता येऊ शकतात. आयुर्वेद आणि इतर उपचार पद्धती विविध व्यक्तींच्या जीनोमशी संबंधित असलेल्या रोगप्रतिकारक तसेच संवेदनशीलतेचा विचार करू शकतील. भारतातील या उपचार पद्धतींमध्ये वापरल्या जाणार्या वनस्पतींमधील औषधी गुणधर्मांचा अभ्यास, जनुकीय माहितीच्या आधारे केला जाऊ शकतो. यामुळे विशिष्ट जीनच्या अभावामुळे किंवा उपस्थितीमुळे, विविध रोगांवर औषधांचा प्रभाव अधिक सुधारता येईल. आयुर्वेदामध्ये विविध उपचार साधनांचा वापर केला जातो. जनुकीय माहितीच्या आधारे कोणत्या साधनांचा प्रभाव कसा आहे, हे समजून घेऊन त्यांचा उपयोग अधिक प्रभावीपणे केला जाऊ शकतो. त्यामुळे उपचारांची कार्यक्षमता अर्थातच वाढेल. आयुर्वेदामध्ये आहार आणि जीवनशैलीवर मोठा जोर देण्यात येतो. जनुकीय माहितीच्या आधारे, व्यक्तीच्या आनुवंशिक गुणधर्मांनुसार उचित आहार आणि आरोग्यवर्धक जीवनशैली निर्धारित केली जाऊ शकते. भारतीय जनुकीय संशोधन जागतिक स्तरावर आरोग्य, कृषी, आणि जीवशास्त्र क्षेत्रातील स्पर्धेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकते. जनुकीय संशोधन केंद्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर प्रभावी ठरणार आहे. 'एआय' आणि मशीन लर्निंगच्या मदतीने, डेटा विश्र्लेषण अधिक प्रभावीपणे केले जाऊ शकते. यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्य वृद्धिंगत करणे आवश्यक आहे. विकसित देशांतील संशोधकांबरोबर भागीदारी साधल्यास, ज्ञान व माहितीचा आदानप्रदान होऊ शकतो. भारतीय जनुकीय संशोधन विकसित राष्ट्रांशी स्पर्धा करण्यास सक्षम ठरविणारे एक महत्त्वाचे साधन आहे. यामुळे भारत आपल्या लोकसंख्येच्या विविध आव्हानांसाठी प्रभावी उपाययोजना विकसित करण्यास, आर्थिक विकास साधण्यासाठी तसेच, आरोग्य सुविधांची गुणवत्ता वाढविण्यास सक्षम होणार आहे. विकसित देशांमध्ये आरोग्य, वैद्यकीय संशोधन आणि कृषी क्षेत्रातील नव्या संधींची द्वारे उघडली आहेत. या तंत्रज्ञानाचा भारतीय संशोधकही वापर करू शकतात. एकूणच, जैवतंत्रज्ञान संशोधनाच्या क्षेत्रातील हा मैलाचा दगड असल्याचे म्हणूनच म्हणता येईल.

# राज्यातील तिसरे दिव्याशा केंद्र बुलढाण्यात; दिव्याशा केंद्र दिव्यांगासाठी पर्वणी – ना. प्रतापराव जाधव

### केंद्रीय राज्यमंत्री यांच्या हस्ते लोकार्पण

### ४७ दिव्यांगांना ३ लाख ५१ हजारांचे साहित्य वाटप








**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** दिव्यांगांना आवश्यक असलेल्या उपकरण, साहित्यासाठी मुंबई, नागपूर अशा ठिकाणी जावे लागत असे. आता दिव्यांगाना आवश्यक साहित्य दिव्याशा केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातच सहज आणि कमी वेळेत उपलब्ध होणार असून दिव्याशा केंद्र हे दिव्यांगांसाठी पर्वणी ठरणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राचा लोकार्पण सोहळा धाड रोड स्थित असलेल्या अपंग निवासी शाळा आणि पुनर्वसन केंद्र येथे आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार संजय गायकवाड, भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगमचे उपव्यवस्थापक के.डी. गोते, दिव्यांग कल्याण व पुनर्वसन संस्थाचे अध्यक्ष जयसिंग जयवार, संस्थेचे विश्र्वस्त गजानन कुलकर्णी, ओमसिंग राजपूत, देशोन्नतीचे सहसंपादक राजेंद्र काळे आदी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री श्री. जाधव म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्यावतीने दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनेअंतर्गत दिव्यांगाना आवश्यक असलेले उपकरणे, साहित्य सहज आणि कमी वेळेत मोफत उपलब्ध व्हावेत यासाठी प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र बुलढाणा येथे सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचा बुलढाणा जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील दिव्यांगांना लाभ होणार आहे. या केंद्रामुळे दिव्यांगांना साहित्य मिळविण्यासाठी होणारा त्रास कमी होणार असून त्यांची क्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. सर्वसामान्य नागरिकाप्रमाणेच त्यांनाही सन्मानाने जगणे सोपे होणार आहे. दिव्यांगाना जास्तीत जास्त सोईसुविधा, साहित्य वाटप व आरोग्याच्या मुलभूत सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र मुंबई, नागपूर नंतर राज्यातील तिसऱ्या क्रमांकाचे व देशातील ६७ वे केंद्र बुलढाणा जिल्ह्यात सुरू झाले आहे. ही बाब जिल्ह्यासाठी अभिमानास्पद आहे. दिव्यांगाप्रमाणे दारिद्र रेषेखालील वयोवृद्ध नागरिकांनाही त्यांच्या आवश्यकतेनुसार साहित्य या केंद्रातून देण्यात येणार आहे. तसेच दिव्यांग व वयोवृद्धावर आधुनिक पद्धतीने उपचार करुन आवश्यक साहित्य कमी वेळेमध्ये उपलब्ध होतील. जिल्ह्यातील गरजू दिव्यांग आणि वयोवृद्ध नागरिकांनी दिव्याशा केंद्रात भेट देवून लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते ४७ दिव्यांगांना ३ लक्ष ५१ हजार रुपयांचे साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये व्हील चेअर, श्रवण यंत्र, ट्राय साईकल, कुबड्या, अंधकाठी अशा विविध प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एलिम्कोचे उपव्यवस्थापक के.डी. गोते यांनी तर संचालन रमेश आराख यांनी केले.

# जिल्हा परिषद उर्दू शाळा येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध संस्कृत कार्यक्रम संपन्न


**दैनिक आपला विदर्भ**

**■ अबुतालीब खान**

**सुलतानपूर :** सुलतानपूर जिल्हा परिषद उर्दू शाळा येथे २६ जानेवारीला सकाळी व्यवस्थापन समितीचे सदस्य अबुतालिब खान यांनी ध्वजारोहण केले यानंतर राष्ट्रगीत घेऊन जिल्हा परिषद उर्दू शाळा चे विद्यार्थी यांनी गावात प्रभात फेरी मार्गे प्रभात फेरी काढून गावामध्ये प्रजासत्ताक दिनाचे लोकांना महत्त्व कळून दिले नंतर जिल्हा परिषद उर्दू शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले सर्वच मुलांनी व गावकऱ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद लुटला कार्यक्रम उत्सव पूर प्रतिसाद मिळाला.




## फ्लेमिंगोची बुलढाण्याकडे झेप; फ्लेमिंगो पक्षी अभ्यासकांना करत आहे आकर्षित





बुलढाणा व जालना जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या धाड परिसरातील करडी धरणावर पक्षी निरीक्षण करत असतांना पक्षी अभ्यासक डॉ. गजेंद्र निकम या पक्षी मित्रांना फ्लेमिंगो या पक्षाचे दर्शन झाले. आपल्या मनमोहक शारीरिक ठेवणीमुळे फ्लेमिंगो कमालीचेच आकर्षक दिसतात. त्यांचं सौंदर्य म्हणजे निसर्गाची शानच आहे. या देखण्या पक्षाला मराठीत अग्निपंख या नावाने ओळखल्या जाते. स्वतःशी फिरत फ्लेमिंगोंचे तालबद्ध नृत्य लक्षवेधून घेणारे असते. बुलढाणा परिसरातील धाड येथील करडी धरणावर फ्लेमिंगोंचे झालेले दर्शन पक्षी अभ्यासकांना निश्र्चितच आकर्षित करीत आहे.

## अरुंधती' पुन्हा येतेय! 'या' मालिकेत मधुराणी गोखले करणार धमाकेदार एन्ट्री

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** स्टार प्रवाह वाहिनीवरील आई कुठे काय करते ही मालिका तुफान गाजली. गेली पाच वर्षे प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या या मालिकेने गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्याच्या अखेरिस प्रेक्षकांचा निरोप घेतला. मालिका संपली असली तरीही या मालिकेतील प्रत्येक पात्राने प्रेक्षकांच्या मनात एक वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अशातच प्रेक्षकांची लाडकी अरुंधती पुन्हा एकदा त्यांच्या भेटीला येणार आहे. सध्या 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' या मालिकेला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळत आहे. या मालिकेत स्वीटी आणि मकरंदच्या लग्नाची धामधूम सुरु आहे. या दोघांच्या लग्नात अरुंधती खास हजेरी लावणार आहे. लवकरच हा भाग प्रसारित होईल. दरम्यान, या भूमिकेबद्दल मधुराणी म्हणाली, 'पुन्हा एकदा अरुंधती साकारायला मिळतेय याचा अतिशय आनंद होत आहे. साधारण दीड महिन्यापूर्वी आमच्या मालिकेने निरोप घेतला. प्रेक्षकांप्रमाणेच मी देखील अरुंधतीला खूप मिस करत होते. सेटवरची लगबग, हातातली स्क्रिप्ट, कॅमेरा या सगळ्या गोष्टी खूप दिवसांनंतर अनुभवायला मिळत आहेत. 'आई आणि बाबा रिटायर होत आहेत' मालिकेत स्वीटी आणि मकरंदच्या लग्नाच्यासाठी अरुंधती खास हजेरी लावणार आहे. नव्या टीमसोबत काम करताना खूप छान वाटतंय, असंही ती म्हणाली. दरम्यान, मधुराणी या मालिकेसाठी खूपच उत्सुक असल्याचं पाहायला मिळालं. लवकरच मालिकेचा हा भाग प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून अरुंधतीला पुन्हा एकदा भेटण्यासाठी प्रेक्षकही आतुर झाले आहेत.

# राज्य महामार्गावरील खड्डा जणू काही बघतोय मोठ्या अपघाताची वाट...तेव्हाच येईल प्रशासनाला जाग

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अशोक मुंढे**

जालना नागपूर या राज्य महामार्गाला मोठ-मोठाले खड्डे पडलेले असून त्या खड्ड्यांमुळे अनेक वाहनांचे अपघात सुद्धा झालेले आहेत.महामार्गावरील खड्डा जणू काही मोठ्या अपघाताची वाट बघतो काय तेव्हा संबंधित अधिकाऱ्यांना जाग येईल असं वाटत आहे महामार्गावरील खड्डे बुजवले जातात परंतु मोठा अपघात झाल्यानंतर तर मग अपघातापूर्वी का नाही बुजवल्या जात हा सर्वसामान्य मध्ये प्रश्र्न उद्भवत आहे

तरी या महामार्गाची अनेक ठिकाणी सुद्धा खड्डे पडलेले सुद्धा आहेत. या राज्य महामार्गावर ब्राह्मण-चिकना या गावाजवळ भला मोठा खड्डा पडलेला आहे. राज्य महामार्गाच्या साईडच्या रस्त्याला मोठमोठाले खड्डे पडलेले असल्यामुळे हे खड्डे चुकवण्यासाठी गाडी ड्रायव्हर हे रॉंग साईडला गाडी टाकत असून समोरून येणाऱ्या गाडीच्या सोबत अपघात होण्याचे सुद्धा नाकारता येत नाही. या खड्ड्यामुळे या ठिकाणी मोठा एक्सीडेंट होण्याची भीती वर्तवल्या जात आहे संभाजीनगर ते नागपूर अशा अनेक ठिकाणच्या जलद गतीच्या बसेस वहाने हे सुद्धा वाहत असून अनेकांना या महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. या राज्य महामार्गावर अनेक शहरे अनेक बाजारपेठ आणि शाळा कॉलेजेस सुद्धा जोडलेले असून या महामार्गावर शाळेतील विद्यार्थी नागरिक यांची दररोज दळण-वळण या मार्गावरून चालू राहते या मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे पडल्यामुळे अनेक समस्यांना आणि अडचणीचा सामना करावा लागत खड्डे असल्यामुळे अपघाताची दाट शक्यता निर्माण महामार्गावर झालेली आहे. राज्य महामार्गावरील खड्ड्यांकडे विशेष लवकरात लवकर लक्ष देण्याची गरज भासत असून या खड्ड्यांकडे संबंधित अधिकारी संबंधित विभागाने विशेष लक्ष देण्यात यावे अशी मागणी वाहनधारकाकडुन होत आहे.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# दुष्काळी आष्टी तालुक्यातील केळी थेट इराणच्या बाजारपेठेत; शेतकऱ्याचा यशस्वी प्रयोग

दैनिक आपला विदर्भ



**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या दुष्काळी आष्टी तालुक्यातील केळीची निर्यात सध्या इराणच्या बाजारपेठेत सुरू आहे. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रयोग करून या शेतकऱ्याने निर्याती योग्य केळीचे पीक घेऊन त्याची निर्यात इराणकडे सुरू केलीय.

आष्टी तालुका हा दुष्काळी म्हणून ओळखला जातो. परिणामी या तालुक्यात पाण्याची नेहमी भ्रांत असते. त्यामुळे शेती करणे कठीण असतं. परंतु अशा असंख्य अडचणींवर मात करून आष्टी तालुक्यातील भातोडी इथल्या शंकर गित्ते या शेतकऱ्याने आधुनिक शेतीची कास धरली आहे.

फेब्रुवारी २०२४ मध्ये पुण्यातून ७२५० रोपे आणून पाच एकर क्षेत्रावर सहा बाय पाच या पद्धतीने केळीची लागवड केली.यासाठी शेत तळ्याच्या माध्यमातून पाण्याची व्यवस्था करून ठिबक सिंचनाद्वारे याचे नियोजन केले. कुटुंबातील सदस्यांची मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर शंकर गित्ते यांनी ही बाग जोपासली आहे. ठिबक, रोपे, फवारणी, शेणखत रासायनिक, खते, मजुरी असा एकरी एक लाख तीस हजार खर्च वगळता सहा लाख रुपयांचे उत्पन्न हाती आले आहे. सध्या केळी बागेची तोडणी सुरू झाली असून हीच केळी इराणच्या बाजारपेठेत निर्यात केली जात आहेत.

आधुनिक शेती करण्यासाठी शंकर गित्ते यांना कृषी विभागाचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले आहे. कृषी विभागाच्या योजनेचा लाभ घेत माळरान जमिनीवर गित्ते यांनी नंदनवन फुलवले आहे. केळीच्या बागेची काळजी घेऊन आत्तापर्यंत १७५ टन एवढा माल पाच एकरात काढला गेलाय. विशेष म्हणजे यासाठी विक्रीला कुठे न जाता थेट इराणमधील व्यापाऱ्यांनी बांधावर या मालाची खरेदी केलीय. आतापर्यंत १३ ट्रकच्या माध्यमातून ही केळी इराणच्या बाजारपेठेमध्ये दाखल झाले आहेत.

शेती परवडत नाही अशी ओरड करून अनेक जण मोठ्या शहरांची वाट धरतात. मात्र आहे त्याच शेतजमिनीत आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरत शेती केल्यास, नक्कीच जिद्दीच्या जोरावर यश मिळते हेच. या शेतकऱ्याने दाखवून दिले आहे.

## संक्षिप्त...

### पाचोरा येथे एका इसमाला दोन गावठी पिस्तूल व चार जिवंत काडतुसासह अटक




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** पाचोरा येथे दि .२६ जानेवारी रोजी पोलीस उपनिरीक्षक चव्हाण के ,पोलीस हेडकॉन्स्टेबल राहुल शिंपी,पोलीस कॉन्स्टेबल दिनेश पाटील हे पाचोरा पोलीस स्टेशन हद्दीतील घडणारे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी व व फरार आरोपींचा शोध घेणे कामे फिरत असताना पाचोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक पवार यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की एक इसम गावठी कट्टा घेऊन जारगाव चौफुली परिसरात फिरत आहे व तो कुठेतरी गुन्हेगारी कारवाई करण्याची शक्यता आहे यावरून पोलीस निरीक्षक अशोक पवार यांनी तात्काळ अशा संशयित ही समास छापा टाकून तात्काळ अटक करण्याच्या सूचना दिल्या त्यानुसार मिळालेल्या बातमीनुसार सदरच्या अरबाज खान जहुर खान यास (वय २४ वर्षे ) रा. अक्सानगर जारगांव पाचोरा यास जबर भाई रेडिएटर्स दुकानाजवळ दिनांक २६ जानेवारी रोजी सायंकाळी ६:३० वाजता अटक करण्यात आली त्याची पंचायत समक्ष जळती घेतली असता या अरबाज खान जवळ दोन गावठी कट्टा तसेच चार जिवंत काढत असे एकूण ४२ हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तूल व जिवंत काढत असे असे साहित्य त्याच्याजवळ मिळून आले त्यानुसार पाचोरा पोलीस स्टेशनला अरबाज खान याच्याविरुद्ध गुन्हा रं. क्रमांक ४०/२०२५ नुसार भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३, २५ गुन्हा दाखल करून आरोपीस अटक करण्यात आली असून यात पाचोरा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक चव्हाणके हे करीत आहेत.

### मस्साजोग गावातील ग्रामस्थ आज अंतरवाली सराटी मध्ये जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेणार- धनंजय देशमुख

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** मयत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख आणि मस्साजोग गावातील ग्रामस्थ आज अंतरवाली सराटी मध्ये जाऊन मनोज जरांगे पाटील



यांची भेट घेणार आहेत. आज रात्री आणि उद्याचा मुक्काम हा अंतरवली सराटी मध्ये राहणार आहे.

कृष्णा आंधळे अद्याप फरार आहे. यामागे नेमके कोण आहे. यात राजकीय व्यक्तीने त्याला लपवून ठेवले आहे का? किंवा त्याला फरार होण्यास मदत केली आहे का? असा प्रश्न धनंजय देशमुख यांनी उपस्थित केला. सुदर्शन घुले याला आज पुन्हा पोलीस कोठडी मिळाली आहे. त्यामुळे त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे. त्यातून बरीच माहिती समोर येईल. अंतरवाली सराटीहून परतल्यानंतर एसआयटी सीआयडीच्या अधिकाऱ्यांना भेटणार आहेत. तर वाल्मीक कराड उपचार घेत असताना त्याच्यावर कोणते उपचार झाले? त्यांना कोणता आजार झाला होता? तसेच जिल्हा रुग्णालयातील कोठडीत का ठेवले नाही? याबाबत अशोक थोरात यांनी प्रभारी जिल्हा शल्य चिकित्सक राऊत यांना पत्रकार परिषद घेऊन माहिती द्यावी अशी मागणी केली आहे.

### बार्शीत मराठा आंदोलकाने वैकुंठ स्नानाद्वारे सरकारचा केला निषेध

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** मराठा समाजाला ओबीसी आरक्षण मिळावे,या मागणीसाठी उपोषण करणारे आनंद काशीद यांनी उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी वैकुंठ स्नान करत सरकारचा तीव्र निषेध केला. काशीद यांनी सरकारच्या निष्क्रियतेवर नाराजी व्यक्त करत, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी वर्षभरापूर्वी दिलेली आश्र्वासने सरकारने पाळलेली नाहीत. आता आरक्षण मिळाल्याशिवाय हे आंदोलन थांबणार नाही, असे ठामपणे सांगितले. काशीद यांच्या या कृतीमुळे स्थानिक स्तरावर आंदोलनाला मोठा पाठिंबा मिळत असून शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.




## नवी मुंबई पोलिसांची धडाकेबाज कारवाई; वर्षभरात गुन्हे उघडकीच्या प्रमाणात तीन टक्के वाढ




दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबई पोलीस दलाच्या माध्यमातून गेल्या वर्षभरात अनेक गुन्हे उघडकीस आणण्यात यश आल असून गुन्हे उघडकीच्या प्रमाणात तीन टक्क्यांनी वाढ झालेली पाहायला मिळत आहे नवी मुंबई पोलीस आयुक्तालाच्या माध्यमातून आज वार्षिक पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होती या पत्रकार परिषदेमध्ये २०२३ २०२४ मध्ये घडलेल्या गुन्ह्यांचा तपशील आणि उघडकीस आलेले गुन्हे जप्त केलेली मालमत्ता इतर बाबींविषयी अधिकृत माहिती देण्यात आली.

दरम्यान, २०२३ मध्ये ६६५६ गुन्हे दाखल होते त्यापैकी ४८९३ गुन्हे उघडकीस आले आहेत. तर २०२४ वर्षामध्ये ७३६९ गुन्हे दाखल झाले असून त्यापैकी ५६७७ गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामुळे २०२३ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये पोलिसांमार्फत गुन्हे उघडकीच्या प्रमाणात ३ % वाढ झालेली आहे

तर वर्ष २०२४ मध्ये ७३६९ गुन्हे उघडकीस आणले असून त्यापैकी शरीरविवृद्ध ७८५ गुन्हे उघडकीस आणले तर मालमत्तेविषयक ११७६ गुन्हे उघडकीस आणले , आर्थिक फसवणुकीबाबत ४२१ गुन्हे उघडकीस आणले आहेत.. त्याचसोबत महिला विषयक ६१६ गुन्हे उघडकीस आणले आहेत.. तर अंमलबजावणीचे १३६२ गुन्हे उघडकीस आणण्यात नवी मुंबई पोलीस दलाला यश आलेलं आहे.. दरम्यान नवी मुंबई परिसरात गुन्हेगारांची संख्या जरी वाढली असली तरी पोलिसांमार्फत कारवाईचे प्रमाण देखील वाढल्याचे पाहायला मिळत आहे.

## खासदार कल्याण काळेंनी घेतली मनोज जरांगेंची भेट




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्याचे खासदार कल्याण काळेंनी मनोज जरांगेंची भेट घेतलीय. विशेष म्हणजे उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी कल्याण काळेंनी जरांगे यांच्यासह उपोषणात बसलेल्या आंदोलकांची भेट घेतली.यावेळी काळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना आंदोलकांसमोर झापण्याचा बनाव केल्याची चर्चा आहे.

अंतरवाली सराटी येथे आंदोलकांना पुरेशा सुविधा मिळत नसल्याचा मराठा आंदोलकांचा आरोप आहे.या सुविधा न देण्यावरून खासदार काळे यांनी जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना फैलावर घेण्याचा प्रयत्न केला. दरम्यान मी उद्या मुंबईत जाणार असून हे उपोषण थांबवण्याची विनंती सरकारकडे करणार असल्याचं काळे यांनी म्हटलंय.

## साताऱ्यात भरधाव कारचा थरार, ५ जणांना उडवले

**सातारा/प्रतिनिधी :** शुक्रवारी दुपारी पुण्यातील हिंजवडी भागात एका भरधाव सिमेंट टँकरने दोन इंजिनिअर तरुणींना उडवलं होतं. संबंधित तरुणी दुचाकीने ऑफिसला जात होत्या, याचवेळी वेगात आलेल्या सिमेंट मिस्कर टँकरने दोन्ही तरुणींना उडवलं. या अपघातात दोन्ही तरुणींचा चिरडून मृत्यू झाला. पुण्यातली ही घटना ताजी असताना आता साताऱ्यात देखील अशीच एक घटना समोर आली आहे. साताऱ्यातील वाई येथे एका भरधाव कारने रस्ता ओलांडणाऱ्या पाच जणांना उडवलं आहे.

या दुर्दैवी अपघातात एक जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींमध्ये एका साडेतीन वर्षाच्या चिमुकल्याचा देखील समावेश आहे. हा भीषण अपघात सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून याचा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित घटना सातारा जिल्ह्यातील वाई बसस्थानकासमोर घडली आहे. पाचगणीच्या दिशेने भरधाव वेगात जाणाऱ्या कारने वाई बस स्थानकासमोर रस्ता ओलांडणाऱ्या पाच जणांना उडवलं. या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला. तर साडेतीन वर्षाच्या मुलासह अन्य चारजण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे आमरण उपोषण

दैनिक आपला विदर्भ




**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरातील ऐतिहासिक बिंदु चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जगातील पहिल्या पुतळ्याचे आवारात कोणतेही धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रम करण्यास बंदी असल्याचा ठराव २०१३ साली कोल्हापूर महानगरपालिकेकडून करण्यात आला होता. मात्र त्याची अंमलबजावणी होत नाही. या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यासाठी काम करणाऱ्या आंदोलकांवर कोल्हापूर म. न. पा. प्रशासक यांनी खोटे गुन्हे नोंद केले होते. म्हणून प्रशासकांवरच ट्रोसिटी कायद्याप्रमाणे गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी संविधान सन्मान युवा प्रतिष्ठान आणि रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) यांच्या वतीने कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आमरण उपोषण केलं जात आहे. २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हे आमरण उपोषण सुरु करण्यात आल्याची माहिती रिपब्लिक पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे जिल्हा सचिव सतीश माळगे यांनी दिली आहे.

## लाडक्या बहिणी हे माझ्या सदैव पाठीशी राहतील- बालाजी कल्याणकर

दैनिक आपला विदर्भ



**नांदेड/प्रतिनिधी :** शिवालय प्रतिष्ठान तर्फे आज मकर संक्रांति निमित्त हळदी कुंकू वाण वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला हे कार्यक्रम गेल्या वीस वर्षापासून आमदार बालाजी कल्याणकर यांच्या पत्नी हे बालाजी कल्याणकर नगरसेवक असल्यापासून हा उपक्रम राबवत आहात आज त्याचाच एक भाग म्हणून आमदार झाल्यानंतर देखील हा उपक्रम चालू असल्याची माहिती शिवालय प्रतिष्ठानच्या अध्यक्षा संध्याकाळी कल्याणकर यांनी पत्रकारांशी बोलताना ही माहिती दिली. यावेळी आमदार कल्याणकर यांची प्रतिक्रिया घेतली असता ते असे म्हणाले की गेल्या अनेक वर्षापासून हा उपक्रम आम्ही घेत असून परत या लाडक्या बहिणींनी मला आमदार केले आहे त्यामुळे लाडक्या बहिणी हे सदैव माझ्या पाठीशी राहतील असा मला विश्वास आहे त्यामुळे मी बहिणींचे आभार मानतो.

## पुष्पा स्टाईलने सुरू असलेल्या विदेशी दारूच्या तस्करीचा पर्दाफाश

दैनिक आपला विदर्भ



**कल्याण/प्रतिनिधी :** राज्य उत्पादन शुल्क ठाणे भागाच्या कल्याणच्या भरारी पथकाने पुष्पा स्टाईलने सुरू असलेल्या विदेशी दारूच्या तस्करीचा पर्दाफाश केला आहे. या तस्करानी चक्क टेम्पोच्या खालच्या बाजूला भला मोठा चोर कप्पा बनवून त्यामध्ये दमन, दादरा नगर हवेली येथील विदेशी दारूचा साठा महाराष्ट्रात आणून विक्री करण्याचा त्यांचा प्लान होता. मात्र राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाच्या कल्याणच्या भरारी पथकाला या टेम्पोची माहिती मिळाली व भरारी पथकाने वाडा सोलापूर रोडवरच सापळा रचत या तस्करीचा पर्दाफाश केला. या टेम्पो मधून भरारी पथकाने सुमारे साडेपाच लाखांचे विदेशी मद्य जप्त केले तर संधीचा फायदा घेत टेम्पो चालक पसार असून त्याच्या साथीदाराला भरारी पथकाने अटक केली हरिसिंग गेहलोत असे या इसमाचे नाव आहे .त्याने हा मद्य साठा कुठून आणला? कुणाला विकणार होता? याचा तपास एक्साईज विभाग करत आहे

टेम्पोमध्ये चोर कप्पा बनवून महाराष्ट्राचा महसूल बुडवून दमन,दादरा नगर हवेली राज्यातील विदेशी मद्याची महाराष्ट्रात तस्करी करण्यात येत असल्याचे उघडकीस आले आहे. वाडा शहापूर मार्गावरून एका टेम्पोमध्ये मोठ्या प्रमाणात दमण, दादरा नगर हवेली येथील विदेशी मदय महाराष्ट्रात विक्री करण्यासाठी बेकायदेशीर रित्या आणण्यात येणार असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्क ठाणे विभागाच्या कल्याणच्या भरारी पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे कल्याणच्या भरारी पथकाचे इन्स्पेक्टर दिपक परब यांनी सहकाऱ्यांसह वाडा शहापूर रोडवर सापड रचला .हा संशयित टेम्पो दिसताच त्यांनी टेम्पो अडवला. मात्र टेम्पो रिकामा दिसला मात्र टेम्पोच्या मागील बाजूस असलेला पत्रा उचकटून पाहिला असता त्याखाली मोठ्या प्रमाणात विदेशी मद्य लपवून ठेवल्याचे आढळून आले. हे विदेशी मद्य दमण, दादरा नगर हवेली येथून महाराष्ट्रात विक्री करण्यासाठी बेकायदेशीर रित्या आणण्यात आल्याचे निष्पन्न झाले.

भरारी पथकाने तत्काळ कारवाई करत हे मद्य जप्त केले. मात्र संधीचा फायदा शोधून टेम्पो चालक हा पसार झाला तर त्याचा साथीदार हरीसिंग गहलोत याला एक्साईज विभागाने ताब्यात घेतलं .हा टेम्पो दमन, दादरा नगर हवेली येथील हा मध्ये साठा घेऊन आल्याचे प्राथमिक माहिती आहे. हा मद्य साठा नेमका कुठून आणला ?, महाराष्ट्रात ते कोणाला विकणार होते याचा तपास राज्य उत्पादन शुल्क विभागाने सुरू केलाय.

# प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राचं केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते लोकार्पण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दिव्यांग तसेच राष्ट्रीय वयोश्री योजनेंतर्गत नागरिकांना गरजेनुसार आवश्यक असलेले साहित्य मोफत उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्यावतीने प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र बुलढाणा येथे सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे लोकार्पण आज केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले असून मुंबई, नागपूर नंतर राज्यातील तिसरा केंद्र बुलढाणा जिल्ह्यात सुरू करण्यात आले आहे. केंद्र सरकारच्यावतीने दिव्यांग बांधवांसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनेअंतर्गत दिव्यांगांना आवश्यक असलेले उपकरणे, साहित्य मोफत सहज आणि कमी वेळेत उपलब्ध व्हावेत या दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्यावतीने प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र सुरू करण्यात आली आहे. देशात आतापर्यंत ६७ केंद्र कार्यान्वित करण्यात आली आहेत. महाराष्ट्र राज्यामध्ये मुंबई, नागपूर नंतर आता बुलढाणा शहरामध्ये प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र सुरू झाले आहे. केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते या केंद्राचा शुभारंभ व लोकार्पण सोहळा बुलढाणा शहरातील धाड रोड स्थित असलेल्या अपंग निवासी शाळा आणि पुनर्वसन केंद्र येथे संपन्न झाला आहे. प्रधानमंत्री दिव्याशा केंद्राच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांना अत्यावश्यक असलेले साहित्य मोफत देण्यात येते. तसेच राष्ट्रीय योजनेअंतर्गत दारिद्र रेषेखालील वयोवृद्ध नागरिकांना त्यांच्या आवश्यकतेनुसार साहित्यही या केंद्रातून देण्यात येते प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम अर्थात ( एलिम्को ) त्यांच्या साह्याने बुलढाणा शहरात सुरू करण्यात आले आहे.






**जीबीएसच्या पेशंटच्या बातमीमध्ये आपण पाहतो की आतापर्यंत जे काही पेशंट आढळले ..ते आपल्याला पुणे किंवा मोठ्या शहरात त्या ठिकाणी आढळलेत.. पण निश्चित आज आपण पाहतो की वेगवेगळ्या प्रकारचे व्हायरस त्या ठिकाणी येत आहेत ..सर्व लोकांना विनंती की आपण स्वतःची काळजी घेतली पाहिजेत.. आपण जास्तीत जास्त म्हणजे गर्दीच्या ठिकाणी जिथे टाळता येईल तिथे टाळलं पाहिजे.. मास वापरला पाहिजेत.. हात नेहमी करता स्वच्छ धुतले पाहिजेत.. आणि स्वच्छता थोडी आपण अंगीकरून आपण असे येणारे व्हायरस असतील किंवा असे साथीचे रोग असतील याच्यापासून आपण स्वतःचा आणि लोकांचा परिसराचा बचाव करू शकतो..**

**केस गळतीच्या बाबतीमध्ये सुद्धा आयसीएमआर चा रिपोर्ट अजून आलेला नाहीये.आणि तात्काळ हे ज्यावेळी प्रकरण लक्षात आलं आपण त्या ठिकाणी आयसीएमआरची टीम दिल्ली आणि चेन्नई वरून आपण त्या ठिकाणी आठ दिवस मुक्कामी ठेवली. त्याच्यानंतर आपण आयुष्य सुद्धा आयुर्वेद असेल, होमिओपॅथी असेल, युनानी असेल यांची टीम सुद्धा आपण त्या ठिकाणी आठ दिवस ठेवली. आणि आज जे आम्ही रिपोर्ट घेत आहोत या आजच्या टीम आणि जे औषध उपचार केलेत तर त्यांचे रिझल्ट अतिशय चांगल्या प्रकारचे आलेले आहेत. या लोकांची केस गेलेली होती त्यांना नवीन केस त्या ठिकाणी येत आहेत. आणि काही लोकांनी त्या औषध प्रिव्हेंटिव्ह म्हणून वापरलं तर त्या लोक सुद्धा केस गळती पासून त्यांचा बचाव होत आहे.. आता पेशंट अतिशय कमी प्रमाणामध्ये त्या ठिकाणी दिसत आहे. एक चार ते पाच दिवसात आयसीएमआर चा रिपोर्ट येईल तसेच त्या ठिकाणी एम्स रुग्णालयाची टीम सुद्धा आणून ठेवली आहे.आपण सर्वतोपरी त्यावर लक्ष ठेवून आहोत.. त्याचं संशोधन झालं पाहिजे. प्रतापराव जाधव, केंद्रीयराज्यमंत्री म्हटले आहेत**

## १०३ गावातील पाणी दूषित

बुलढाणा जिल्हा हा खारपान पट्टामध्ये येतो..जवळपास आपल्या बुलढाणा जिल्ह्यातली १७० पेक्षा गावाशे आहेत..त्या ठिकाणी क्षारयुक्त पाणी आहे.. आणि त्याचे दुष्परिणाम सुद्धा मागच्या काळामध्ये आपण पाहिले की अनेक घरांमध्ये तुम्हाला किडनीचे पेशंट दिसत होते.. पण आता महायुतीच्या सरकारमध्ये जल जीवन मिशनच्या माध्यमातून, राष्ट्रीय पेयजलच्या माध्यमातून मोठमोठ्या योजना राबवण्यात आल्या .. खामगाव,जळगाव, संग्रामपूर, नांदुरा आणि शेगाव या तालुक्यातले जे काही खारपान सगळ्या गावांना वानप्रकल्पाचे शुद्ध पाणी देण्याचं काम सुरू झालेला आहे.. जे १०३ पाण्याचे नमुने आलेले आहेत ही गोष्ट जरी खरी असली.. पण हे पाणी लोक पिण्यासाठी वापरत नाहीत ..आज अनेक गावाला आपण शासनाच्या वतीने आरो सिस्टीम लागलेले आहेत.. अनेक लोक त्या ठिकाणी आरोच पाणी पिण्यासाठी वापरतात.. ते वापरण्यासाठी मात्र हे पाणी काही गावांमध्ये वापरले जातात..

## विविध वृत्त...

### इलेक्ट्रिक पोलवर खाट बांधून नागरिकाचे उपोषण



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावतीत एका अनोख्या उपोषणाची चर्चा आता जिल्ह्यात रंगू लागली आहे. इलेक्ट्रिकचा खांब रस्त्याच्या बाजूला करण्यासाठी विलास चर्जन यांनी चक्क इलेक्ट्रिक पोलवर खाट बांधून जीव धोक्यात घालत उपोषण केले आहे.

अमरावती जिल्ह्यातील चांदूर बाजार तालुक्यातील सोनेरी येथील ही घटना आह वारंवार इलेक्ट्रिक पोल काढण्यासंदर्भात तक्रारी करून देखील पोल हटवण्यात न आल्याने चर्जन यांनी अनोख्या उपोषणाला केली सुरुवात. चक्क इलेक्ट्रिकच्या पोलवर खाट बांधून त्यावर जीव धोक्यात घालत सर्जन यांनी उपोषण सुरू केले या अनोख्या उपोषणाची चर्चा आता जिल्ह्यात रंगू लागली आह या उपोषणामुळे प्रशासनाला जाग येणार का असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झालाय.

### मराठी भाषा पंधरवडा : जिल्हाधिकारी कार्यालयात 'पुस्तक प्रदर्शन व विक्री' आणि 'ग्रंथदान' उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** मराठी भाषेच्या संवर्धनाच्या दृष्टीने प्रचार व प्रसार होण्यासाठी राज्यभरात मराठी भाषा पंधरवडा राबविण्यात येत आहे. या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून मंगळवारी दि. २८ जानेवारी रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात 'पुस्तक प्रदर्शन व विक्री'चे आयोजन करण्यात आले आहे. यासह 'ग्रंथदान' हा उपक्रम देखील राबविण्यात येणार आहे.

हा उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन भूसंपादन इमारतीमध्ये सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत पुस्तक प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त पुस्तकप्रेमी, वाचनप्रेमींनी लाभ घ्यावा. तसेच 'ग्रंथदान' उपक्रमात सहभागी होवून कमीत कमी एक पुस्तक इतर वाचकांसाठी दान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

दानरूपी पुस्तके दि. २८ जानेवारी रोजी पुस्तक प्रदर्शन व विक्री कार्यक्रमाच्या ठिकाणी नवीन भूसंपादन इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय येथे स्वीकारण्यात येतील, असे कळविण्यात आले आहे.

### बुलढाणा येथे पाच दिवसीय पशुपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्रद्वारा जिल्हा उद्योग केंद्रामार्फत उद्योग, व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या सुशिक्षित बेरोजागार युवक व युवतींसाठी बुलडाणा येथे शेळीपालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैसपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रशिक्षण दि. ३ ते ७ फेब्रुवारी २०२५ या पाच दिवसांच्या कालावधीत होणार आहे.

या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश हा सुशिक्षित बेरोजगार यांनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वत:चा उद्योग व्यवसाय सुरु करावा हा आहे. या प्रशिक्षणात शेळीपालन, कुक्कुट आणि गाय म्हेस पालनाचे तंत्र व प्रकार, त्यांच्या जाती, लसीकरण, संशोधन, रोग व लक्षणे, खाद्य निर्मिती व चाऱ्याचे प्रकार व उद्योग सुरु करण्यासाठी संपूर्ण सहकार्य केले जाणार आहे. त्यासोबत उद्योजकता विकास, उद्योग संधी मार्गदर्शन, शासकीय योजनाची माहितीचे मार्गदर्शन या प्रशिक्षणात तज्ञ व्यक्ती करणार आहे.

प्रशिक्षणात प्रवेश घेऊ इच्छिणारा उमेदवार हा किमान ५ वी पास, वय १८ ते ५० वर्षे असावे. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र दिल्या जाईल. प्रशिक्षणासाठी नोंदणी प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी दि. ५ फेबुवारीपर्यंत कार्यालयीन वेळेत गणेश गुप्ता प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, तहसील कार्यालया जवळ, चिखली रोड, बुलडाणा यांच्याशी संपर्क साधावा. याशिवाय त्यांना ९०११५७८८५४ / ८२७५०९३२०१ या भ्रमणध्वनीवरही संपर्क साधण्याचे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी किशोर अंभोरे यांनी केले आहे.



## २० वर्षीय महिलेला शेतात नेऊन सामूहिक अत्याचार, अत्याचार करणारा नातेवाईकच

**मुंबई/प्रतिनिधी :** पतीला जामिनदार मिळवून देण्याचे आमिष दाखवून तीन जणांनी एका २० वर्षीय महिलेवर पंचवटी परिसरातील रामवाडी येथील चौघुले पेट्रोल पंपामागील शेतातील मोकळ्या जागेत सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. अत्याचार करणारा एक व्यक्ती महिलेचा नातेवाईक असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यामुळे नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिला व तिचा पती यांचे ती अल्पवयीन असतानाच प्रेमसंबंध होते. पीडितेच्या पालकांनी दिलेल्या फिर्यादीवरून महिलेचा पती काही दिवसांपासून मुंबईला बलात्कार व पोस्कोच्या गुन्ह्यात अटकेत आहे. त्याला सोडविण्यासाठी जामिनदार मिळवून देतो, असे आमिष दाखवून पीडितेच्या दिराच्या व आणखी एकाच्या मदतीने संशयित अमित विजय दामले (२५, रा. व्हाइट हाउसच्या मागे, मिशन मळा, शरणपूर रोड) पाने फिर्यादी महिलेबरोबर जबरदस्तीने शारीरिक संबंध केले.

## जिल्हा कारागृहातील विकास कामाची जिल्हाधिकाऱ्यांनी केली पाहणी





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्हा नियोजन समिती व शासनाकडून प्राप्त निधीतून बुलढाणा जिल्हा कारागृह येथे विविध विकास कामे सुरु आहे. या कामाची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील व अपर जिल्हाधिकारी शेलार यांनी कारागृहास भेट दिली.

भेटी दरम्यान बंद्याकरीता सुरु करण्यात आलेले नवीन मुलाखत कक्ष, बांधकाम सुरु असलेले व्हि.सी.कक्ष, पाकगृह, दोन प्रार्थना भवन येथे सुरु असलेल्या बांधकामांची पाहणी केली. त्यानंतर सर्कल विभागातील बॅरकची पाहणी करुन बंद्यांशी संवाद साधला. तसेच कारागृहाव्दारे बंद्यांसाठी राबवित असलेल्या उपक्रमाची माहिती घेतली. यामध्ये बंद्यांना त्यांचे नातेवाईकांशी संपर्क साधणे, व्हिडीओ कॉलीग सुविधा, लन व्हिडीओ सुविधा, ग्रंथालय, विधीसहाय्य, अल्पमुदतीचे विविध प्रशिक्षण तसेच शेती व वृक्षलागवडी याचा समावेश होता.

जिल्हाधिकारी यांच्या भेटी दरम्यान कारागृहातील बंद्यांनी विविध सांस्कृतीक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यावेळी जिल्हाधिकारी यांनी कारागृहात राबविण्यात येऊ शकणाऱ्या योजना व कारागृहातील बंदी कारागृहातुन मुक्त झाल्यानंतर त्यांच्या पुर्नवसानसाठी बंद्यांनी व कारागृह प्रशासनाने करावयाची उपाययोजना संदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधुन प्राप्त नवीन रुग्णवाहिकेचे जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांचेमार्फत पुजन करुन नवीन रुग्णावाहिका कारागृहास प्रदान करण्यात आली.

सदर कार्यक्रमा प्रसंगी कारागृह अधीक्षक संदिप भुतेकर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, तुरुंगाधिकारी मोहन पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता शुभम देशमुख तसेच सर्व कारागृह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी योग्य मार्केटिंग ची गरज – जिल्हाधिकारी डॉ मिताली सेठी



दैनिक आपला विदर्भ

**नंदुरबार/प्रतिनिधी :** ग्रामविकास व पंचायत राज विभाग ,महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान उमेद तर्फे नंदुरबार येथे ग्रामीण भागातील स्वयंसहायता केंद्र अर्थात बचत गटाच्या महिलांनी आपल्या कौशल्याने उत्पादित केलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन व विक्री चे उद्घाटन आज जिल्हाधिकारी डॉ मिताली सेठी यांच्या हस्ते आज करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सावन कुमार तसेच उमेद चे अधिकारी व बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या.



या प्रदर्शनात खाद्यपदार्थ ,मसाले तसेच ग्रामीण भागातील कलाकुसर ने उत्पादित विविध वस्तू ठेवण्यात आले आहेत. हे प्रदर्शन २७ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत सुरू राहणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी यांनी सांगितले की या प्रदर्शनात चांगल्या उत्पादित वस्तू बचत गटाच्या महिलांनी आणल्या आहेत. शेतीच्या माध्यमातून धान्यापासून पूरक व पोषण आहार महिलांनी तयार केलेला आहे. बचत गटाला प्रोत्साहन देण्यासाठी पॅकिंग आणि मार्केटिंग यांची गरज असून यावर आम्ही भर देणार आहोत.

जिल्ह्यात मिरची, तांदुळ,बाजरी व भगर याचे चांगले उत्पादन होते यावर प्लॅन तयार करून यापासून उत्पादित वस्तूंना बाजार भाव चांगल्या प्रकारे मिळेल तसेच शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळेल यासाठी आमचे प्रयत्न राहणार आहे.स्थलांतर रोखण्यासाठी कोणत्या गावातून जास्त स्थलांतर झाले आहे याचा डाटा गोळा करून नरेगा सारख्या योजना राबवून व बचत गटा मार्फत महिलांना सक्षम करून स्थलांतर रोखण्याचा देखील आमचा प्रयत्न राहणार आहे असे जिल्हाधिकारी डॉ मिताली सेठी यांनी बोलतांना सांगितले.

## आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी घेतला कचारगड यात्रा पुर्वतयारीचा आढावा

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** आदिवासी कुलदैवतेचे श्रध्दास्थान म्हणून कचारगड देवस्थान प्रसिध्द आहे. या ठिकाणी दरवर्षी फरवरी माघ पौर्णिमेनिमित्त ५ दिवसाच्या गाव यात्रेचे आयोजन करण्यात येते. या यात्रेस झारखंड, बिहार, मध्यप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र व इतर राज्यातुन भाविक येत असतात. यात्रेदरम्यान भाविकांची कुठलीही गैरसोय होणार नाही त्यादृष्टीने स्वच्छ भारत अभियानाचा संकल्प ठेवून कचारगड यात्रेचे प्रशासनाने सुक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी दिले त्यांनी आज गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या यात्रेचा पूर्वतयारीचा आढावा घेतला. कचारगड यात्रेनिमित्ताने स्वच्छतेला विशेष प्राधान्या देण्यात यावे. पिण्याच्या पाण्याचा नियोजनबध्द कृती आराखडा तयार करुन रस्त्याच्या दोन्ही बाजुला पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. भक्त निवासाची व्यवस्था करण्यात यावी. लाईटींगची व्यवस्था करतांनी अधिक समयसूचकतेने लाईट लावावे. यात्रेदरम्यान वीज खंडीत होणार नाही याची विशेष दक्षता घ्यावी. यात्रेत अनुचित प्रकार घडू नये यासाठी सी.सी. टी.व्ही. कॅमेरे लावणे आवश्यक आहे. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य पथक तैनात करण्यात यावे. पोलीस विभागाने कायदा व सुव्यवस्थेचा चोख बंदोबस्त ठेवावा. कचारगड यात्रेत प्रत्येक भक्तांचा सन्मान झाला पाहिजे याची दक्षता घेण्यात यावी. पिण्याच्या पाण्याची प्रभावी व्यवस्था करावी. स्वच्छता उत्तम ठेवण्याकडे विशेष लक्ष द्यावे. कचारगड यात्रेची इतर राज्यातील भाविकांनी सुध्दा प्रेरणा घ्यावी असे आपल्या जिल्ह्याचे नावलौकीक करावे, असे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी यावेळी सांगितले.

